# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

**Ph.No.: 0721-2992511** **Website : www.sgbau.ac.in** **Email : directornss@sgbau.ac.in**


क्र. संगाबाअवि/रासेयो-१७/आव्हान/१३५/२०२४ दिनांक : ०७/१०/२०२४

**दरपत्रक सुचना क्र. ०९/२०२४**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये 'आव्हान-चॅन्सेलर्स ब्रिगेड' (महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबीर) २०२४ चे आयोजन करण्यात येत असुन सदरचे आयोजनास्तव भाडे तत्वावर पोर्टेबल टॉयलेट व ईतर तत्सम सुविधा पुरविण्याकरिता गुरुवार दिनांक ११ ऑक्टोंबर, २०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती (महाराष्ट्र) ४४४६०२ येथे सिलबंद लिफाफ्यात अनुभवी व दरपत्रक सुचनेतील अटी आणि शर्तीची पुर्तता करणाऱ्या मान्यताप्राप्त संस्था/पुरवठाधारक यांचेकडून दरपत्रके मागाविण्यात येत आहेत. दर पत्रकाच्या अटी व शर्ती आणि विहित नमुन्याचा तपशिल http://sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | विवरण | अंदाजित संख्या (युनिट/नग) | दर (सर्व करांसह) एक नग/युनिटकरिता दर नमुद करावे |
|---|---|---|---|
| १ | **भाडे तत्वावरील पोर्टेबल टॉयलेट**<br>टाईप- ईंडियन, सिंगल पोर्टेबल टॉयलेट ट्रान्सपोर्टेशन व मैला उपसणे सुविधेसह | ३० नग (१० दिवसांकरीता) | |

**टिप :-**

१) उपरोक्त दरपत्रकातील दरे (सर्व करांसहित) परिशिष्ट-१ मध्ये विहिती केलेल्या दरपत्रक आवेदनातच सादर करणे अनिवार्य आहे. परिशिष्ट-१ नुसार विहित नमुन्यामध्ये नसलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.
२) दरपत्रकांसह परिशिष्ट-२ मधिल अटी व शर्ती, परिशिष्ट-३ मधील स्वंघोषणापत्र व ईतर नमुद दस्ताऐवज सादर करणे अनिवार्य आहे.
३) विहित तपशिल व अटी आणि शर्तीच्या अनुरुप नसलेल्या अपुर्ण, खोडतोड असलेले व अधिलेखन केलेले दरपत्रके कुठलेही कारण न देता नाकारल्या जातील. अंतिम मुदतीनंतर प्राप्त निविदांचा विचार केला जाणार नाही.
४) विद्यापीठाद्वारे आदेशित केल्यानुसार उपरोक्त साहित्यांचा/सुविधांचा पुरवठा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर, तपोवन जवळ, मार्डी रोड, अमरावती (महाराष्ट्र) ४४६०२ येथे करणे पुरवठाधारास बंधनकारक राहिल.
५) समाधानकारकपणे कामे पुर्ण केल्यानंतरच देयकाचे शोधन करण्यात येईल.
६) सदरचे दरपत्रक अगर दरपत्रकातील कोणताही भाग कोणतीही पूर्व कल्पना न देता रद्द करणे व राखून ठेवणे तसेच सुधारणा करणे आणि संपुर्ण दरपत्रक नाकारणे इ. अधिकार विद्यापीठाकडे राखुन ठेवले आहेत.

संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

प्रति,

१) मे. निर्मन इंडिया सर्व्हिसेस,रहाटणी,पुणे
२) मे.यश प्लॉस्ट इंटरप्राईजेस,दत्त नगर चौक, पुणे ४११०१७
३) मे. समर्थ कॅबीन इंजिनिअरींग,दहीसर, ठाणे ४००६१२
४) मे. स्वच्छ सॅनीटेशन सोल्युशन, गणेश पेठ, नागपूर ४४००१८
५) मे. पर्यावरण सोल्युशन,गणेश नागपुर ४४००२४
६) मे.हरीकृपा मल्टीयुनिक फसिलिटी मॅनेजमेंट सर्व्हिसेंस, अयोध्या नगर, नागपूर ४४००२४
७) मे.लिबर्टी फॅब्रोटेक, पंचवटी, नाशिक ४२२००३
८) मे.झिरो डी इंडस्ट्रिज प्रा.लि.,वागळे इस्टेट,ठाणे (पश्चिम) ४००६०४
९) नोटीस बोर्ड, राष्ट्रीय सेवा योजना कार्यालय, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
१०) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संकेतस्थळ http://sgbau.ac.in

## <u>दरपत्रक आवेदन</u>

प्रति,

संचालक, राष्ट्रीय सेवा योजना,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये 'आव्हान-चॅन्सेलर्स ब्रिगेड' (महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबीर) २०२४ चे आयोजन करण्यात येत असुन सदरचे आयोजनास्तव भाडे तत्वावरील पोर्टेबल टॉयलेट व इतर तत्सम सुविधा पुरविण्याकरीता दरपत्रकाचे माध्यमातुन दरे सादर करणे.**

संदर्भ : दरपत्रक सुचना क्र. ०९/२०२४, दिनांक ०७ आक्टोंबर, २०२४

मा. महोदय,

मी/आम्ही ------------------------------------------------------------ वरिल नमुद विषय व संदर्भीय दरपत्रक सुचनेतील अटी व शर्तीनुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे माहे नोव्हेंबर, २०२४ मध्ये 'आव्हान-चॅन्सेलर्स ब्रिगेड' (महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबीर) २०२४ चे आयोजन करण्यात येत असुन सदरचे आयोजनास्तव भाडे तत्वावरील पोर्टेबल टॉयलेट व इतर तत्सम सुविधा पुरविण्याकरीता दरपत्रकाचे माध्यमातुन दरे प्रेषित करित आहोत.

| **अ.क्र.** | **विवरण** | **अंदाजित संख्या (युनिट/नग)** | **दर (सर्व करांसह)** एक नग/युनिटकरिता दर नमुद करावे |
|---|---|---|---|
| १ | **भाडे तत्वावरील पोर्टेबल टॉयलेट**<br>टाईप- ईंडियन, सिंगल पोर्टेबल टॉयलेट ट्रान्सपोर्टेशन व मैला उपसणे सुविधेसह | ३० नग<br>(१० दिवसांकरीता) | |

मी /आम्ही दरपत्रक सुचना क्र. ०९/२०२४, दिनांक ०७ आक्टोंबर, २०२४ मध्ये नमुद अटी व शर्ती काळजीपुवर्क वाचल्या असुन त्या मला/आम्हाला मान्य आहेत व मी/आम्ही पुर्णपणे पालन करील. मी/आम्ही दरपत्रक दस्ताऐवजात निर्दिष्ट कालावधिकरिता उपरोक्त साहित्य पुरविण्याचे स्विकृत करत असुन ते माझ्या/आमच्यावर बंधनकारक राहिल याची मला/आम्हाला पुर्ण जाणीव आहे. मला/आमच्या संस्थेस सदरचे काम मंजुर झाल्यास ते मी/आम्ही दिलेल्या विहित मुदतीत पार पाडेल. मला/आम्हाला या बाबत पुर्ण कल्पना आहे की, माझ्या/आमच्या कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर/दिरंगाई अथवा हलगर्जीपणा झाल्यास विद्यापीठ निश्चित करेल अशा दंडास अथवा कायदेशिर कारवाईस मी/आम्ही पात्र राहीन.

संस्था/पुरवठाधारकाचे संपुर्ण नाव :----------------------------------------------------

संस्था/पुरवठाधारकाचे फर्मचे संपुर्ण नाव : ----------------------------------------------------

संस्था/पुरवठाधारकाचे फर्मचे पत्ता पिनकोड सह : ----------------------------------------------------

संपर्काची माहिती/तपशिल

दुरध्वनी क्रमांक – : ----------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक – : ----------------------------------------------------

ई-मेल - : ----------------------------------------------------

फर्मचा शिक्का : ----------------------------------------------------

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

Ph.No.: 0721-2992511 Website : www.sgbau.ac.in Email : directornss@sgbau.ac.in

**दरपत्रक सुचना क्र. ०९/२०२४**
**अटी व शर्ती**

१) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात शनिवार दिनांक ११ ऑक्टोंबर, २०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजेपर्यंत संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर, अमरावती (महाराष्ट्र) ४४४६०२ येथे सादर करावे.
२) दरपत्रकातील दरे (सर्व करांसहित) परिशिष्ट-१ मध्ये विहिती केलेल्या दरपत्रक आवेदनातच सादर करणे अनिवार्य आहे. परिशिष्ट-१ नुसार विहित नमुन्यामध्ये नसलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. नमुद दरांव्यतिरिक्त ईतर कुठलाही खर्च देय राहणार नाही.
३) दरपत्रकांसह परिशिष्ट-२ मधिल अटी व शर्ती, परिशिष्ट-३ मधील स्वंघोषणापत्र व ईतर नमुद दस्ताऐवज सादर करणे अनिवार्य आहे.
४) विहित तपशिल व अटी आणि शर्तीच्या अनुरुप नसलेल्या अपुर्ण, खोडतोड असलेले व अधिलेखन केलेले दरपत्रके कुठलेही कारण न देता नाकारल्या जातील. अंतिम मुदतीनंतर प्राप्त निविदांचा विचार केला जाणार नाही.
५) संस्था/पुरवठाधारकांनी दरपत्रकातील अटी व शर्तीचे प्रथम काळजीपुर्वक वाचन करुन आणि कामाचे स्वरुप लक्षात घेवुनच दरपत्रके सादर केली आहे असे ग्राह्य समजण्यात येईल.
६) उपरोक्त साहित्य/सेवांचा पुरवठा संत गाडगे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ परिसर, तपोवन जवळ, मार्डी रोड, अमरावती (महाराष्ट्र) ४४६०२ येथे करणे पुरवठाधारास बंधनकारक राहिल.
७) विद्यापीठाव्दारे पुरवठादारकांना पाण्याची व विद्युतीकरणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.
८) संस्था/पुरवठाधारकाने दरपत्रक आवेदन शुल्क रु. ५००/- (अक्षरी रु. पाचशे मात्र) चा भरणा **वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती** यांचे नावे देय असलेले धनाकर्ष/बँकर्स चेक स्वरुपात दरपत्रकासह सादर करावे. दरपत्रक आवेदन शुल्क ना परतावा राहील.
९) संस्था/पुरवठाधारकाने दरपत्रकासह खालील नमूद केलेले स्वयं साक्षांकित दस्ताऐवज अनिवार्य पध्दतीने सादर करावे.
   १. दरपत्रक आवेदन शुल्क भरणा केल्याचे दस्ताऐवज (धनाकर्ष/बँकर्स चेक).
   २. सेवा व वस्तु कर (जीएसटी) नोंदणी प्रमाणपत्र. सेवा व वस्तु कर (जी.एस.टी) अंतर्गत संस्था/पुरवठाधारक नोंदणीकृत नसल्यास तसे हमीपत्र रु. १००/- चे स्टँप पेपरवर सादर करावे.
   ३. पॅन कार्ड.
   ४. दुकान कायदा परवाना किंवा फर्मचे नोंदणीकृत कार्यालयाचा किंवा कामाच्या ठिकाणाचा पुरावा संबंधी दस्तऐवज.
   ५. संस्था/पुरवठाधारकास अशा पध्दतीच्या कामाचा विद्यापीठ/शासकिय/निमशासकिय कार्यालय/ नामांकित शैक्षणिक संस्था स्तरीय अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल. त्या संर्दभातील माहिती द्यावी आणि पुराव्यांच्या झेरॉक्स सोबत जोडाव्यात.
   ६. दरपत्रक आवेदन (परिशिष्ट – १ प्रमाणे)
   ७. दरपत्रक अटी व शर्ती (परिशिष्ट – २ प्रमाणे)
   ८. संस्था/पुरवठाधारकाने सादर केलेले सर्व कागदपत्रे/माहीती खरी असल्याचे, फर्मचे नांव कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाने पुरवठादारांच्या काळ्या यादीत टाकलेले नसलेबाबतचे स्वघोषणापत्र (परिशिष्ट – ३ प्रमाणे)
१०) विद्यापीठ व आयोजन समितीचे निर्देशानुसार प्रशिक्षण शिबीराचे कालावधीत उपरोक्त सुविधाचा पुरवठा करणे संस्था/पुरवठा धारकास बंधनकारक राहील.
११) संस्था/पुरवठाधार स्टार्टअप मध्ये नोंदणिकृत असल्यास प्राधान्य देण्यात येईल. स्टार्टअप किंवा ईन्क्युबेशन केंद्रात नोंदणी असल्या बाबतचे दस्ताऐवज सादर करणे बंधनकारक राहील त्याशिवाय सदर बाब विचारात घेता येणार नाही.
१२) संस्था/पुरवठाधारकाने उपरोक्त नमुद साहित्यांचा पुरवठा विहित मुदतीत न केल्यास किंवा त्यात कुठलीही कसुराई/ दिरंगाई किंवा हलगर्जीपणा झाल्याचे निर्दशनास आल्यास संबंधित संस्था/पुरवठाधारक विद्यापीठाने ठरविलेल्या दंडास पात्र राहिल. सदरचा दंड न भरल्यास हि रक्कम देय असलेल्या देयकातुन कपात करण्यात येईल व संबंधिता विरुध्द आवश्यक कायदे व नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल आणि संस्था/पुरवठा धारकास काळ्या यादीत टाकण्यात येईल.
१३) सदर दरपत्रकाचा कालावधी हा प्रशिक्षण शिबीराचे कामकाज पुर्ण होईपावेतो असेल. काही अपरिहार्य कारणास्तव प्रशिक्षण शिबीराचे आयोजन पुढे ढकलल्यास सदर दरपत्रकाचा कालावधी त्या अनुषंगाने सुधारीत करण्यात येईल व सदर मंजुर दरानुसारच संस्था/पुरवठाधारकास उपरोक्त साहित्य पुरविणे बंधनकारक राहिल. सदर दर हे ३१ मार्च, २०२५ पर्यंत मंजुर राहतील.
१४) संस्था/पुरवठाधारकाने कोणत्याही प्रकारे उपनिविदाकारक नेमण्यात येवु नये. असे निदर्शनास आल्यास संस्था/पुरवठाधारकाचे कार्यादेश तत्काळ रद्द करुन सदर कार्यादेश दुसऱ्या संस्था/पुरवठाधारकास देण्याचा निर्णय विद्यापीठामार्फत घेण्यात येईल व त्याबाबत संस्था/पुरवठाधारकाचे कुठलेही म्हणने (मौखीक/लेखी) विचारात घेतले जाणार नाहीत.
१५) मंजुर संस्था/पुरवठाधारकास सदरचे कामाकरीता अदा करण्यात येणा-या देयकामध्ये लागु असणारे व शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या कर कपाती व त्यावरील अतिरिक्त कर कपात करण्यात येईल. सर्व कर भरण्याची जबाबदारी संस्था/पुरवठाधारकाची राहील.
१६) प्राप्त दरपत्रके स्विकारणे अथवा नामंजुर करणे, किंवा दरपत्रकातील दरासंबंधी तडजोड (Negotiation) करणे आवश्यक वाटल्यास काम विभागुन देणे अथवा उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राखुन ठेवले आहेत.
१७) संस्था/पुरवठाधारक यांना शासकीय/निमशासकीय कामकाजाच्या बाबतीत काळ्या यादीत घोषीत केलेले असल्यास अशा संस्था/पुरवठाधारक यांनी दरपत्रक भरु नयेत. असे आढळुन आल्यास दरपत्रक विचारात घेतली जाणार नाही किंवा अशा संस्था/पुरवठाधारकांचे दरपत्रक मंजुर झालेले असल्यास ते कुठलीही पुर्व सुचना न देता रद्द करण्यात येईल.

१८) उपरोक्त साहित्य उपलब्ध करुन देण्यासंदर्भात केंद्र, राज्य शासनाचे व विद्यापीठ प्राधिकरणाचे वेळोवेळी निर्गमित होणारे आदेश, परिपत्रकमध्ये निर्देशित केलेल्या सर्व अटी, शर्ती व नियम संस्था/पुरवठाधारकास लागु राहतील.

१९) दरपत्रक प्रक्रिये दरम्यान किंवा स्वीकृती नंतर कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास विद्यापीठाचा निर्णय अंतिम राहील. संस्था/पुरवठाधारकाने न्यायालयात व न्यायाधिकरण प्राधिकरणासमक्ष खटला दाखल केल्यास सदर खटला हा अमरावती न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये चालविण्यात येईल.

२०) समाधानकारकपणे कामे पुर्ण केल्यानंतरच १००% देयकाचे शोधन करण्यात येईल. समाधानकारक पुरवठा न झाल्यास अथवा आयोजन समितिची सेवा/सुविधा बाबत तक्रार असल्यास त्याअनुषंगाने संस्था/पुरवठाधारक विद्यापीठाने निर्धारित केलेल्या दडांस पात्र राहिल व सदरची रक्कम त्यांचे देय असलेले देयकातुन वसुल करण्यात येईल.

२१) सदरचे दरपत्रक अगर दरपत्रकातील कोणताही भाग कोणतीही पूर्व कल्पना न देता रद्द करणे व राखून ठेवणे तसेच सुधारणा करणे आणि संपुर्ण दरपत्रक नाकारणे इ. अधिकार विद्यापीठाकडे राखुन ठेवले आहेत.

संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

मी /आम्ही दरपत्रक सुचना क्र. ०९/२०२४, दिनांक ०७ आक्टोंबर, २०२४ मध्ये नमुद अटी व शर्ती काळजीपुवर्क वाचल्या असुन त्या मला/आम्हाला मान्य आहेत व मी/आम्ही सदरचे पुर्णपणे पालन करील. मी/आम्ही दरपत्रक दस्ताऐवजात निर्दिष्ट कालावधिकरिता उपरोक्त सुविधा पुरविण्याचे स्विकृत करत असुन ते माझ्या/आमच्यावर बंधनकारक राहिल याची मला/आम्हाला पुर्ण जाणीव आहे. दरपत्रकातील अटी व शर्तीमध्ये उधृत केलेले सर्व दस्ताऐवजांशी सुसंगत असे दरपत्रक मी/आम्ही सादर करित आहोत. मला/आमच्या संस्थेस सदरचे काम मंजुर झाल्यास ते मी/आम्ही दिलेल्या विहित मुदतीत पार पाडेल. मला/आम्हाला या बाबत पुर्ण कल्पना आहे की, माझ्या/आमच्या कामकाजात कोणत्याही प्रकारची कसुर/दिरंगाई अथवा हलगर्जीपणा झाल्यास विद्यापीठ निश्चित करेल अशा दंडास अथवा कायदेशिर कारवाईस मी/आम्ही पात्र राहीन.

निविदाकाराचे नाव व स्वाक्षरी ---------------------------------

निविदाकाराचे फर्मचे नाव ---------------------------------------

फर्मचा शिक्का

**-----------------------------------------------------------xxxxx-----------------------------------------------------------------**

**परिशिष्ट - ३**

**स्वघोषणापत्र**

**(संस्था/पुरवठाधारकाच्या फर्मच्या लेटरहेडवर दरपत्रकासह सादर करावे)**

मी/आम्ही ---------------------------------------------- पत्ता ---------------- सत्यप्रतिज्ञेवर लिहुन देतो की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती या कार्यालयाकडील 'आव्हान-चॅन्सेलर्स ब्रिगेड' (महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबीर) २०२४ सदरचे आयोजनास्तव कापडी परदे खरेदी व फिटींगकरिता संस्था/पुरवठाधारकाची नियुक्ती करणे करीता मे. ---------------------------------------- या फर्मने दरपत्रक सादर केलेली असुन, सदर दरपत्रकाकरिता मी/आम्ही संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठास दरपत्रकासोबत सादर केलेले सर्व कागदपत्रे/माहिती खरी असुन, मी/आम्ही अथवा माझे/आमचे फर्मचे नावे कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयाने पुरवठादारांच्या काळया यादीत टाकलेले नाही किंवा यापुर्वी टाकले असल्यास त्याचा कालावधी संपुष्टात आला आहे. मी/आमचे फर्मने उक्त-दरपत्रकाच्या अनुषंगाने सादर केलेली कागदपत्रे व माहिती खोटी आढळल्यास दरपत्रकाच्या कुठल्याही टप्प्यात मी/आम्ही भा.दं.वि. कलम १९९,२०० अन्वये शिक्षेस पात्र राहील, तसेच मी/आम्ही सादर केलेली दरपत्रक अवैध ठरेल.

ठिकाण : --------------------
दिनांक : --------------------

निविदाकाराचे नाव व स्वाक्षरी ---------------------------------

निविदाकाराचे फर्मचे नाव ---------------------------------------

फर्मचा शिक्का